**ज्योतिषविषयक**

सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी

**तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com






सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १६९ वा | गुरुवार, दि.०५ फेब्रुवारी २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# मोदींनी देश अमेरिकेला विकला !! एपस्टीन फाइल्स आणि अदानींवरील खटल्यामुळे ट्रम्पपुढे लोटांगण

## पंतप्रधान मोदींची संसदेत येण्याची हिंम्मत नाही- राहुल गांधी यांनी तोफ डागली

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** हिंदुस्थान-अमेरिकेतील मुक्त व्यापार करारावरून लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज मोदी सरकारवर तुफानी हल्ला चढवला. "हा करार म्हणजे नरेंद्र मोदींनी दबावाखाली येऊन केलेली तडजोड आहे. एपस्टीन फाइल्समधील गुपितं आणि गौतम अदानींवरील खटल्यामुळे मोदींनी ट्रम्पपुढे लोटांगण घातले आहे. देशाने कष्टाने मिळवलेले सगळे काही विकले आहे. संपूर्ण देशच अमेरिकेला विकला आहे," अशी तोफ राहुल गांधी यांनी डागली.

अमेरिकेसोबत मुक्त व्यापार करारावर हिंदुस्थानने काल शिक्कामोर्तब केले. ट्रम्प यांनी सोमवारी रात्री याची घोषणा केली. त्यानंतर हिंदुस्थानचे वाणिज्य व उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी त्यास दुजोरा दिला. संसदेच्या आवारात पत्रकारांशी बोलताना राहुल गांधी यांनी या करारावर भाष्य केले. या वेळी त्यांनी नरेंद्र मोदी यांना लक्ष्य केले. अमेरिकेशी होणारा व्यापार करार चार महिन्यांपासून थांबला होता. या चार महिन्यांत करारावर काहीच चर्चा झाली नाही. याची कारणे नरेंद्र मोदींना आणि मलाही माहीत आहेत. मात्र काल संध्याकाळी अचानक मोदींनी त्यावर स्वाक्षरी केली. याबद्दल राहुल यांनी आश्चर्य व्यक्त केले.



**एपस्टीन फाइल्समध्ये खूप माल बाकी!**

अमेरिका सरकार खुल्या करत असलेल्या एपस्टीन फाइल्समध्ये नरेंद्र मोदी यांचा उल्लेख आला आहे. त्याचा संदर्भ देत राहुल गांधी म्हणाले, "एपस्टीन फाइल्समध्ये अजून खूप माल आहे. या फाइल्स पूर्णपणे प्रसिद्ध झालेल्या नाहीत. त्यात काय आहे याची देशाला उत्सुकता आहे. मात्र अमेरिकेने ते प्रसिद्ध केलेले नाही. त्यामुळेदेखील मोदी प्रेशरखाली आहेत," असा दावा राहुल गांधी यांनी केला.

**अदानी हीच मोदी-भाजपची आर्थिक तटबंदी**

"ज्यांनी नरेंद्र मोदी यांची प्रतिमा बनवली आहे, तेच आता ती उद्ध्वस्त करत आहेत. अदानींवर अमेरिकेत एक खटला सुरू आहे. मात्र केवळ अदानी हेच त्यांचे लक्ष्य नाही. नरेंद्र मोदी यांची आर्थिक तटबंदी हे त्यांचे लक्ष्य आहे. अदानींवरील खटला हा खरंतर मोदींवरचाच खटला आहे. कारण अदानी हेच मोदी आणि भाजपची आर्थिक ताकद आहे हे त्यांना माहीत आहे," असे राहुल गांधी म्हणाले.

नरेंद्र मोदींवर भयंकर दबाव आहे. कराराच्या माध्यमातून मोदींनी देशातील जनतेने, शेतकऱ्यांनी घाम गाळून, रक्त आटवून मिळवलेले सारे काही विकले आहे. हजारो कोटी खर्चून फुगवलेला मोदींच्या प्रतिमेचा फुगा फुटू शकतो. याचा अंदाज सत्ताधाऱ्यांना आणि खुद्द मोदींना आला आहे. त्यामुळेच ते मला बोलू देत नाहीत. मोदी घाबरलेत. त्यांनी अमेरिकेशी तडजोड केली आहे.

**नरवणे यांच्या पुस्तकावरून विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची टीका**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंहही हे पुस्तक नाही असे सांगतात. पण देशातील प्रत्येक तरुणाला माहीत आहे की हे पुस्तक अस्तित्वात आहे," असे राहुल गांधी म्हणाले. पंतप्रधान मोदींची संसदेत येण्याची हिंम्मत नाही, ते संसदेत आले तर त्यांना मी हे पुस्तक देईन असे राहुल गांधी म्हणाले.

राहुल गांधी यांनी माजी सैन्यप्रमुक मनोज नरवणे यांच्या पुस्तकाचा संदर्भ देत सांगितले की, या पुस्तकातील मुख्य मुद्दा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भूमिकेबाबत आहे. "या पुस्तकातील सर्वात महत्त्वाची ओळ म्हणजे पंतप्रधानांनी दिलेला संदेश - 'जो योग्य वाटेल ते करा'," असे ते म्हणाले.

राहुल गांधी यांच्या म्हणण्यानुसार, जेव्हा तत्कालीन लष्करप्रमुख जनरल नरवणे यांनी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांना फोन करून 'चिनी रणगाडे आपल्या हद्दीत आले आहेत, आता काय करायचे?' असा प्रश्न विचारला, तेव्हा सुरुवातीला त्यांना कोणतेही उत्तर मिळाले नाही. "नरवणे यांनी परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल आणि संरक्षण मंत्र्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, पण कुणाकडूनही उत्तर मिळाले नाही," असा दावा राहुल गांधी यांनी केला.

(पान 2 वर..)

## भाजपाच्या पाठीशी उभे रहा ; जि.प सदस्यांना आमदार निधी पेक्षा एक कोटी जास्तीचा निधी देणार

### पालकमंत्री जयकुमार गोरे यांची कुरुल येथे सभा



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** देशात पंतप्रधान ना.नरेंद्र मोदी, राज्यात मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली देश व राज्य प्रगतीपथावर जात आहे.ही निवडणूक कार्यकर्त्यांची आहे.त्यांना बळ देऊन ग्रामीण विकास करण्याची निवडणूक आहे.आणि मी स्वतः राज्याचा ग्रामविकास मंत्री आहे.त्याच बरोबर जिल्ह्याचा पालकमंत्री सुद्धा मीच आहे.त्यामुळे मी मोहोळ तालुक्यातील जनतेला आश्वस्त करतो की कुरुल चे उमेदवार सचिन जाधव व कामतीचे उमेदवार विमलताई खताळ यांच्या पाठीमागे उभे रहा.मी जिल्हा परिषदेच्या सदस्याला आमदार निधी पेक्षा एक कोटीचा जास्तीचा निधी देतो असे प्रतिपादन ग्रामविकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

मोहोळ तालुक्यातील कुरूल व पाटकुल येथील भारतीय जनता पक्षाच्या प्रचारार्थ आयोजीत जाहीर सभेत पालकमंत्री जयकुमार गोरे बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर माजी आमदार राजन पाटील, माजी आमदार यशवंत माने, जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील, कामती गटाच्या विमलताई खताळ, कुरुल गटाचे उमेदवार सचिन जाधव, कोमल आवताडे, अक्षय खताळ, बिरूदेव मोटे, अस्लम चौधरी, अंकुश आवतडे, सोमेश क्षीरसागर, सुशील क्षीरसागर आदींसहभाजपा पदाधिकारी उपस्थित होते.

त्यांनी पुढे सांगितले की निवडणुका या 'आम्ही यापूर्वी काय केले आहे आणि येणाऱ्या काळात काय करणार आहोत' अशा विकासकामांच्या मुद्द्यावर झाली पाहिजे. मात्र इथं वैयक्तिक टीकाटिप्पणी जास्तीची होत आहे. दोन भाऊ दोन ठिकाणी वेगवेगळ्या पक्षातून उभे राहिले आहेत. म्हणजे आम्ही दोघे भाऊ वेगवेगळ्या पक्षात मिळून खाऊ अशी भूमिका घेतली आहे असे नाव न घेता उमेश पाटील व संतोष पाटील यांच्यावर टीका केली.

**जिल्ह्याला कर्तव्यदक्ष पालकमंत्री लाभले**



सोलापूर जिल्ह्याला गेल्या अनेक वर्षापासून मंत्रिपद नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे जिल्ह्याचा कारभार इतर जिल्ह्यातील पालकमंत्र्यांवर येतो. मात्र सोलापूर जिल्ह्याचे पालकत्व जयकुमार गोरे यांनी स्वीकारल्यापासून जिल्ह्यात भरीव विकास निधीला सुरुवात झाली आहे. जिल्ह्यातील प्रत्येक मतदारसंघावर जया भाऊंचे विशेष लक्ष आणि प्रेम आहे. भाजपाच्या कार्यकर्त्यांना जया भाऊंच्या माध्यमातून एक विशेष स्पिरीट प्राप्त होते. त्यामुळे कार्यकर्त्यांना चांगले बळ मिळते. खरोखरच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवाभाऊंच्या नेतृत्वाखाली जिल्ह्याचे पालकमंत्री जयाभाऊ खूप कर्तव्यदक्ष पालकमंत्री म्हणून आपल्याला लाभले आहेत.

**- विमलताई खताळ,** कामती जि.प.उमेदवार

**पालकमंत्री च्या नेतृत्वाखाली आणखीन काम करणार**



जकराया शुगर च्या माध्यमातून कुरुल -बेगमपूर परिसरातील शेकडो युवकांच्या हाताला काम दिले आहे. भविष्यात देखील वेगवेगळे उद्योग उभा करण्याचा मानस आहे. आपल्या जिल्ह्याला पालकमंत्री जयाभाऊ सारखं खमकं नेतृत्व लाभलं आहे. त्यांच्या नेतृत्वात कुरुल मतदार संघाचा कायापालट करणार आहे. बेरोजगार युवकांना उद्योगाच्या आणखीन संधी उपलब्ध करून देणार आहे.

**- सचिन जाधव,** कुरुल जि.प. उमेदवार

## सोलापूर महानगरपालिकेच्या 29 अधिकारी, कर्मचाऱ्यांना आर्थिक दंड !



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नागरिकांना पारदर्शक आणि विहित मुदतीत सेवा मिळाव्यात यासाठी लागू असलेल्या 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाची' कडक अंमलबजावणी सोलापूर महानगरपालिकेत सुरू झाली आहे. या अंतर्गत आपल्या कामात निष्काळजीपणा दाखवणाऱ्या आणि नागरिकांचे अर्ज प्रलंबित ठेवणाऱ्या विविध विभागांतील 29 अधिकारी व कर्मचाऱ्यांवर प्रशासनाने दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला आहे.

**नेमकी कारवाई काय?**

महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाने 4 फेब्रुवारी 2026 रोजी हा आदेश निर्गमित केला आहे. यामध्ये प्रामुख्याने घनकचरा व्यवस्थापन, नगररचना, कर आकारणी आणि विभागीय कार्यालय क्र. 5 मधील कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. या कर्मचाऱ्यांनी व्यवसाय परवाना, ड्रेनेज दुरुस्ती, झोन दाखला (पान 2 वर..)




## खैराव - मानेगाव उपसा सिंचन योजना पूर्ण करणार : रणजितसिंह शिंदे




**माढा (कटूसत्य वृत्त):-** खैराव - मानेगाव उपसा सिंचन योजना लवकर पूर्ण करणार असल्याचे सोलापूर जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे यांनी मानेगाव गटातील भारतीय जनता पक्षाचे उमेदवार पृथ्वीराज सावंत यांच्या प्रचारा दरम्यान आयोजित सभेत सांगितले.

यावेळी रणजितसिंह शिंदे म्हणाले की -केंद्रात व राज्यात भारतीय जनता पक्षाचे डबल इंजिन सरकार आहे. यामुळे तालुक्यातील विकास कामे मोठ्या प्रमाणात होत आहेत. पृथ्वीराज सावंत काम करणारे सक्षम नेतृत्व आहे. सर्वसामान्याचा कामाचा माणूस आहे. प्रा. शिवाजीराव सावंत यांनी केलेली कामे व दादासाहेब साठे यांची मिळालेली साथ यामुळे पृथ्वीराज सावंत हे निश्चितपणे विजयी होणार आहेत. यावेळी प्रा.



शिवाजीराव सावंत म्हणाले की पृथ्वीराज सावंत यांच्या कार्याची व कर्तृत्वाची ओळख राजवी ॲग्रो कारखान्याच्या माध्यमातून झाली आहे. माझ्या जिल्हा परिषद सदस्यत्वाच्या व पृथ्वीराज सावंत यांच्या पंचायत समिती सदस्यत्वाच्या काळात मानेगाव भागात मोठ्या प्रमाणावर कामे केली आहेत. मानेगाव जिल्हा परिषद गटाच्या विकासासाठी पृथ्वीराज सावंत यांना विजयी करण्याचे आवाहन केले.

पृथ्वीराज सावंत म्हणाले की मानेगाव मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी मी सदैव प्रयत्नशील राहणार आहे. राजवी ॲग्रो पॉवर साखर कारखाना, सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळे, दुष्काळात मोफत, पाणीपुरवठा, चारा पुरवठा, टाक्या वाटप केले आहे. राजवी ॲग्रो साखर कारखान्याच्या माध्यमातून पूरग्रस्त भागातील ऊस प्राधान्याने नेला आहे.पूरपरिस्थिती वेळीही ग्रामस्थांनी सहकार्य केले आहे. त्या ग्रामस्थांनी मला विजयी करून सेवेची संधी द्यावी.

# अखेर बसवेश्वर पुतळा उभारणी कामाला झाली सुरुवात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अखेर बहुप्रतिक्षित बसवेश्वर सर्कल (कोंतम चौक) येथील जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळा उभारणी कामाला सुरुवात झाली.

जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळा उभारणीचे काम गेली तीन वर्षे सुरू होते. पण काम पूर्ण होत नव्हते. महापालिका प्रशासनाकडून या कामात दिरंगाई होत होती. यामुळे बसव प्रेमींच्या मनात रोष निर्माण झालेला होता. प्रशासनाला जाग यावी यासाठी शहर जिल्ह्यातील बसव प्रेमींनी शनिवारी एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण केले होते. त्याची दखल घेऊन प्रशासन कामाला लागले.



नगर अभियंता सारिका अकुलवार यांनी उपोषण स्थळी येऊन सांगितल्याप्रमाणे आज सोमवारी कामाला सुरुवात झाली.

केंद्रीय आयुष मंडळाचे सदस्य व शिव-बसव चरित्रकार डॉ. शिवरत्न शेटे व महात्मा बसवेश्वर जन्मोत्सव मंडळ (जुळे सोलापूर)चे अध्यक्ष श्रीशैल हत्तुरे यांच्या हस्ते पुतळा उभारणी कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

याप्रसंगी चंद्रकांत रमणशेट्टी, ॲड. राजशेखर बिराजदार-पाटील, वीरेंद्र हिंगमिरे, आनंद मुस्तारे, गणेश चिंचोळी, बाबासाहेब कुलकर्णी, शिवलिंगप्पा शाबादे, विश्वनाथ आमणे, दशरथ वडतीले, बसवराज बगले, चन्नवीर चिट्टे, शशिकांत बिराजदार, सकलेश बाभुळगावकर, भीमाशंकर पदमगोंडा, दयानंद भोरे, वैभव विभुते, सिंधुताई काडादी, पुष्पा गुंगे, शशिकला रामपुरे, प्रार्थना बिज्जरगी, वर्षा विभुते, विद्या जोडभावी, स्मिता नाईक, माधुरी बिराजदार, रेश्मा निडगुंदी, साक्षी हौदे उपस्थित होते

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजशेखर बुरकुले यांनी तर आभार प्रदर्शन अमित रोडगे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बसवराज लोहार, सुनील धरणे, विजयकुमार बिराजदार, सोमनाथ चौधरी, राहुल जत्ती, सिद्राम छपेकर, विशाल पाटील, राहुल कत्ते यांनी परिश्रम घेतले.

# प्रा. चंद्रकांत ढोले यांचा सेवापूर्ती समारंभ संपन्न

## शिक्षण प्रवाहातील आनंदयात्री या गौरव ग्रंथाचे झाले प्रकाशन

**अनगर (कटूसत्य वृत्त):-** येथील श्री अनगरसिद्ध शिक्षण प्रसारक मंडळ, अनगर संचलित कै. शंकरराव बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य चंद्रकांत ढोले सर यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित समारंभ मोठ्या उत्साहात व भावनिक वातावरणात संपन्न झाला. ते मुख्याध्यापक म्हणून 33 वर्ष सात महिने 21 दिवस एवढी प्रदीर्घ सेवा देऊन सेवानिवृत्त होत आहेत.



सर्वप्रथम स्वर्गीय लोकनेते बाबुराव अण्णा पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन झाले . मान्यवरांचा सन्मान करण्यात आला यावेळी शिक्षण प्रवाहातील आनंदयात्री या ढोले सरांच्या जीवनावरील गौरव ग्रंथाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन झाले व यावेळी त्यांना मानपत्र देऊन त्यांचा सपत्नीक सेवापुतीर्चा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माजी शिक्षण संचालक गंगाधर म्हमाने उपस्थित होते. आपल्या भाषणात ते म्हणाले की, 'मी या शाळेला अनेक वेळा भेट दिली आहे. गुणवत्ता, शिस्त व संस्कार यामुळे ही शाळा ओळखली जाते. ग्रामीण भागातील सर्वात मोठी शाळा म्हणून या विद्यालयाचा लौकिक आहे. ढोले सरांनी राजन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही शाळा उत्तम व आदर्श पद्धतीने चालवली असून अनेक सुसंस्कारित पिढ्या घडवण्याचे महत्त्वाचे कार्य या शाळेने केले आहे ग्रामीण भागात उत्तम शिक्षणाची सोय या शाळेने केली आहे.'

कार्यक्रमात माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत सर यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, 'ढोले सरांनी अतिशय निष्ठेने व समर्पित भावनेने काम केले आहे. ते एक उत्तम प्रशासक असून त्यांच्या या गुणवत्तेचा संस्थेने पुढील काळातही उपयोग करून घ्यावा,' असे मत त्यांनी मांडले.

यावेळी मारुती फडके उपायुक्त परीक्षा परिषद पुणे यांनीही ढोले सरांना सेवानिवृत्तीच्या शुभेच्छा दिल्या.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष व माजी आमदार राजन पाटील होते. अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले की, 'अवघ्या 27 विद्यार्थ्यांपासून सुरू झालेली ही शाळा आज 2315 विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली आहे. शाळेच्या व संस्थेच्या विस्तारात प्राचार्य ढोले सरांचा वाटा मोठा आहे. त्यांच्या अंगी असलेली संस्थेप्रती निष्ठा व कामावरील श्रद्धा लक्षात घेऊन त्यांची संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती करण्यात येत आहे,' अशी घोषणा त्यांनी केली. यावेळी नियुक्तीचे अधिकृत पत्र ढोले सरांना प्रदान करण्यात आले.

प्राचार्य चंद्रकांत ढोले सर यांच्या सेवाकाळातील शैक्षणिक गुणवत्ता, शिस्तप्रियता, प्रशासन कौशल्य व विद्यार्थीकेंद्रित दृष्टिकोन याचा सर्व वक्त्यांनी गौरव केला. कार्यक्रमाच्या शेवटी शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकवर्ग यांच्या वतीने ढोले सरांचा सत्कार करण्यात आला.

हा सेवापूर्ती समारंभ केवळ निवृत्तीचा नसून एका यशस्वी शैक्षणिक प्रवासाच्या गौरवाचा सोहळा ठरला, अशी भावना उपस्थितांमध्ये व्यक्त होत होती.

यावेळी लोकनेते साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक ओमप्रकाश जोगदे, माजी प्राचार्य रंगसिद्ध दसाडे माजी प्राचार्य भिकाजी कुलकर्णी प्राचार्य सुधीर गायकवाड प्राचार्य बशीर बागवान प्राचार्य संजय करंडे माजी मुख्याध्यापक विश्वजीत लटके मुख्याध्यापक रामचंद्र पाटील मुख्याध्यापक संजय डोंगरे मुख्याध्यापक विश्वजीत देशमुख मुख्याध्यापक शिवाजी तळेकर उप मुख्याध्यापक महादेव चोपडे पर्यवेक्षक माधव खरात आदी शिक्षण क्षेत्रातील मान्यवर शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सत्यवान दाढे यांनी सूत्रसंचालन केले तर माधव खरात यांनी आभार मानले.

# महायुतीचा विकासाचा अजेंडा, पाणी-वीज-रस्त्यांसह मूलभूत प्रश्नांवर थेट संवाद

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** चोपडी जिल्हा परिषद गटाचे महायुतीचे उमेदवार चेतनसिंह केदार सावंत व चोपडी पंचायत समिती गणाचे उमेदवार अजय सरगर यांनी बलवडी गावात गावभेट दौरा करत विकासाचा आक्रमक अजेंडा थेट जनतेसमोर मांडला. या दौऱ्यात त्यांनी घराघरात जाऊन नागरिकांच्या प्रत्यक्ष भेटी घेत पाणी, वीज, रस्ते, आरोग्य, शिक्षण व शेतीसंबंधी मूलभूत प्रश्नांची माहिती जाणून घेतली. या दौऱ्यात त्यांनी गावातील प्रत्येक वाडी-वस्तीवर जाऊन कुटुंबांची प्रत्यक्ष भेट घेत त्यांच्या समस्या, अडचणी, अपेक्षा जाणून घेतल्या. ह्लनिवडणूक म्हणजे केवळ मत मागणे नव्हे, तर जनतेच्या प्रश्नांची जबाबदारी स्वीकारणेह्व हा संदेश या दौऱ्यातून दिला.



ग्रामस्थांशी संवाद साधताना चेतनसिंह केदार सावंत म्हणाले, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या माध्यमातून कायमस्वरूपी पाणी, रस्ते व विजेचा प्रश्न सोडवला जाईल.

केंद्र व राज्यात महायुतीचे सरकार असून शासनाच्या सर्व योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्याची क्षमता महायुतीकडेच आहे. केंद्र व राज्यात महायुतीचे सरकार असून शासनाच्या सर्व योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्याची ताकद महायुतीकडेच आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीत आपले प्रतिनिधी असतील, तर बलवडीसह संपूर्ण चोपडी गटाचा सर्वांगीण विकास निश्चित आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीत महायुतीची सत्ता आल्यास बलवडी गावाचा सर्वांगीण विकास निश्चित आहे, असा ठाम विश्वास चेतनसिंह केदार सावंत यांनी व्यक्त केला.

या दौऱ्यात नगरसेविका सुजाताताई केदार सावंत यांनी महिलांशी स्वतंत्र संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. बचतगट, महिला सक्षमीकरण, आरोग्य, पाणी, घरकुल योजना, स्वच्छता व मुलींच्या शिक्षणासंदभार्तील प्रश्नांवर त्यांनी महिलांना विश्वास दिला. ह्लमहिलांचा सहभाग वाढला तरच गावाचा खरा विकास शक्य आहे,ह्व असे त्या म्हणाल्या.

या गावभेट दौऱ्याला युवक, महिला, शेतकरी, ज्येष्ठ नागरिकांचा प्रचंड व उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विकासासाठी महायुतीला मतदान करून चोपडी जिल्हा परिषद गटाचे उमेदवार चेतनसिंह केदार सावंत व चोपडी पंचायत समिती गणाचे उमेदवार अजय सरगर यांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

बलवडी गावात महायुतीच्या विजयाचा आत्मविश्वास या दौऱ्यातून ठळकपणे दिसून आला.

# 'बेधडक अक्कलकोट' नावाने राजकीय व्यक्तींची बदनामी करणाऱ्या आरोपींना अटक

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दिनांक 03/02/2026 रोजी अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे येथे फियार्दी नामे आप्पा सदाषिव झिपरे, वय 48 वर्शे, रा. 261, कल्याण नगर मजरेवाडी, सोलापूर यांनी फिर्याद दिली की, त्यांच्या ओळखीचा अमर, रा. बाळी वेस, सोलापूर याने त्यांचेकडून त्याचे सिमकार्ड हरवले आहे असे सांगून त्याच्या नावे सिमकार्ड विष्वासाने घेतले होते. सदर सिमकार्डचा परस्पर गैरवापर करून अमर याने इन्स्टाग्राम या सोषल मिडीयावर 'बेधडक अक्कलकोट'नावाने खाते तयार केले आहे. या 'बेधडक अक्कलकोट' या इन्स्टाग्राम खात्यावरून अमर याने अक्कलकोट तालुक्यातील राजकीय लोकांची बदनामी होण्याच्या उद्देषाने व्हीडीओ व पोस्ट अपलोड करत आहे. अमर यास विष्वासने सीम कार्ड घेवून दिले असता ते स्वतःसाठी वापरणे अपेक्षीत असताना ते कार्ड कोणासाठी व कषासाठी वापरणार हे फियार्दीस न सांगता त्याने फियार्दीस न सांगता खोटे बोलून दिषाभूल करून सीम कार्डचा अप्रामाणीकपणे गैरवापर करून फसवणूक केली आहे. त्यावरून अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. 57/2026, भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 318(2),316(4) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचा तपास करत असताना मुख्य आरोपी नामे अमर रमेष पाटील, रा. सेंट जोसेफ षाळेच्या मागे, रेल्वे लाईन्स सोलापूर याचे सांगणेवरून आरोपी नामे अमरनाथ उमेष भोगडे, रा. गवंडी गल्ली, उत्तर कसबा, बाळीवेस, सोलापूर याने फियार्दी यांचे नावाने विष्वासाने सिमकार्ड घेतले. त्यानंतर मुख्य आरोपी अमर रमेष पाटील, अमरनाथ उमेष भोगडे व महेष चंद्रकात चौगुले, रा. धोत्री, ता. दक्षीण सोलापूर यांनी संगनमत करून महेष चौगुले याच्या मोबाईल हॅण्डसेटमध्ये फियार्दी विष्वसाने दिलेले सीमकार्डचा गैरवापर करून इन्स्टाग्राम या सोषल मिडीयावर 'बेधडक अक्कलकोट'या नावाने खाते निर्माण केले. त्यावर राजकीय लोकांची बदनामी होण्यासाठी व्हीडीओ व पोस्ट अपलोड करून फसवणूक केले असल्याचे तांत्रीक पुराव्यावरून निशपन्न झाले आहे.

यावरून सदर गुन्ह्यास माहिती तंत्रज्ञान कायदा 2000 चे कलम 43, 66(डी) हे वाढीव कलम लावण्यात आले असून आरोपी नामे अमरनाथ उमेष भोगडे, रा. गवंडी गल्ली, उत्तर कसबा, बाळीवेस, सोलापूर यास दिनांक 03/02/2026 रोजी 22/30 वा. अटक केली आहे. त्यास आज रोजी मा.न्यायालसमोर हजर केले असता त्याची 02 दिवसाची पोलीस कोठडी रिमांड दिली आहे. गुन्ह्याचा अधिक तपास करत असताना आरोपी नामे महेष चंद्रकांत चौगुले रा. धोत्री यास अटक केली आहे. मुख्य आरोपी अमर रमेष पाटील, रा. सेंट जोसेफ षाळेच्या मागे, रेल्वे लाईन्स सोलापूर याचा षोध सुरू आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास दिपक भिताडे, पोलीस निरीक्षक, अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण हे करत आहेत.

(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

# सैनिकी मुलांचे वसतिगृह सोलापूर येथे पहारेकरी पदासाठी अर्ज करावे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय सोलापूर यांचे अधिपत्याखालील सैनिकी मुलाचे वसतिगृह सोलापूर येथे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित मानधनावर पहारेकरी-01 पद भरावयाचे आहे. पहारेकरी पदाचा अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य देण्यात येईल मानधन रुपये 21159/- प्रतिमहा असेल.

तसेच सदरील पद हे निवासी असून पहारेकरी पदासाठी नियुक्त झालेल्या उमेदवाराने रात्रीचा पहारा देणे व मुक्कामी रहाणे आवश्यक आहे. पहारेकरी पद हे माजी सैनिक प्रवगार्तून भरावयाचे असून सोलापूर जिल्हयातील माजी सैनिकांनी आपले अर्ज सैनिक सेवेची व इतर शैक्षणिक कागदपत्रासह या कार्यालयात सादर करावे. सदर पदाकरिता दिनांक 12 फेब्रुवारी 2026 रोजी मुलाखती घेण्यात येतील. तरी उमेदवारांनी स्वतःची मुळ कागदपत्रे सोबत आणावीत, सदर पद भरतीसाठी माजी सैनिक यांना प्राधान्य देण्यात येईल. माजी सैनिक उपलब्ध न झाल्यास नागरी जीवनातील उमेदवारांचा विचार केला जाईल. तरी सोलापूर जिल्ह्यातील पात्र व गरजू माजी सैनिकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे.

# दि. 7 व 9 फेब्रुवारी रोजी मतदान

## मतमोजणी दिवशी आठवडे बाजार बंद चे आदेश

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मा. राज्य निवडणूक आयोगाने दिनांक-13 जानेवारी 2026 च्या पत्रान्वये जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-2026 चा कार्यक्रम घोषित करण्यात आल्याप्रमाणे व सदर दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आलेली असून. त्यानुसार मतदाना दिवशी मतदान केंद्राच्या परिसरात व मतमोजणी दिवशी मतमोजणी केंद्रावर कायदा व सुव्यवस्थेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने आवश्यक त्या सर्व उपाययोजना करुन मतदान व मतमोजनी प्रक्रिया निर्भय व निष्पक्ष वातावरणात पार पाडणे आवश्यक असल्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-2026 च्या जाहीर कार्यक्रमानुसार सोलापूर जिल्ह्यातील मतदान दिनांक 07 फेब्रुवारी 2026 रोजी व मतमोजणी दिनांक 09 फेब्रवारी 2026 असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. व यास अनुसरुन सोलापूर जिल्ह्यात मतदाना दिवशी बाजार शनिवार दिनांक 07 फेब्रुवारी 2026 रोजी व मतमोजणी दिवशी बाजार सोमवार दिनांक 09 फेब्रवारी 2026 रोजी खालील नमुद गावात आठवडा बाजार भरविण्या मनाईचे आदेश देण्यात येत आहेत.

प्र.जिल्हादंडाधिकारी, गणेश नि-हाळी यांच्या अधिकारान्वये महाराष्ट्र पोलीस अधिनियम, कलम 37(3) व दि. मार्केट ॲण्ड फेअर ॲक्ट 1862 मधील कलम 5 (ग) जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-2026 च्या अनुषंगाने मतदान केंद्राच्या व मतमोजणीच्या परिसरात सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील सार्वजनिक कायदा व सुव्यवस्था राखणेसाठी खालील गावांचे आठवडा बाजार बंद ठेवण्याचे आदेश देण्यात येत आहेत.

उत्तर सोलापूर तालुका- मौजे कळमण, मौजे पाकणी इ. मोहोळ तालुका- मौजे सय्यद वरवडे, मौजे पापरी, मौजे हिवरे, मौजे देवडी इ. दक्षिण सोलापूर तालुका- मौजे कंदलगाव, औज, मंद्रुप, बरूर, होटगी इ. बार्शी तालुका- मौजे बार्शी शहर, बावी, ममदापूर, घारी, इ. करमाळा तालुका- मौजे केत्तुर नं.2 ,चिखलठाण नं.1, इ. माढा तालुका- मौजे टाकळी टे. मौजे मोडलिंब इ. सांगोला तालुका- मौजे गौडवाडी, आलेगांव, वाटंबरे, पाचेगाव खुर्द, मानेगांव इ.पंढरपूर तालुका- मौजे तावशी, पुळूशी,उंबरे मगरवाडी, खरसोळी, उंबरगाव, भंडीशेगाव, बोहाळी, इ. माळशिरस तालुका- मौजे वेळापूर, इ. अक्कलकोट तालुका- मौजे शिरवळ, चपळगांव, कर्जाळ, जेऊरे इ. सर्व गावांध्ये शनिवारी दि 07 फेब्रवारी 2026 मतदानाशी आठवडे बाजार बंद राहतील.

तसेच मतमोजणी दि.9 फेब्रवारी 2026 रोजी सोमवारीझ्रअक्कलकोट शहर मंगळवेढा येथील बाजार बंद राहतील.

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी., मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# सोलापूर विभागाने वर्षभरात उभारली मजबूत मालवाहतूक व्यवस्था

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने आयओसीएल पाकणी साइडिंगवर पेट्रोलियम उत्पादनांच्या मालवाहतुकीत उल्लेखनीय कामगिरी नोंदवत अवघ्या पहिल्याच वर्षात रेक लोडिंगचे त्रिशतक पूर्ण केले आहे. जानेवारी २०२५ पासून सुरू झालेल्या या उपक्रमातून जानेवारी २०२६ अखेरपर्यंत तब्बल ३०१ रेक लोड करण्यात आले असून, यामुळे सोलापूर विभागाला सुमारे ४४.२ कोटी रुपयांचा मालवाहतूक महसूल प्राप्त झाला आहे.


पाकणी साइडिंगवरून हाय स्पीड डिझेल व मोटर स्पिरिटसारखी पेट्रोलियम उत्पादने रेल्वेमार्गे कर्नाटकातील हिरेनंदुरू, विजयपुरा, देसूर, नवलूर, महाराष्ट्रातील मिरज तसेच तेलंगणातील रामगुंडम आदी ठिकाणी पाठवली जात आहेत. यामुळे महाराष्ट्रासह शेजारील राज्यांमध्ये इंधन पुरवठ्याची व्यापक व सुरक्षित साखळी निर्माण झाली आहे.

ही साइडिंग महाराष्ट्रातील पहिली आयओसीएल रेक-लोडिंग सुविधा ठरली असून, देशातील आयओसीएलच्या विशेष मार्केटिंग रेक-लोडिंग केंद्रांपैकी नववे स्थान तिला प्राप्त झाले आहे. पूर्वी मर्यादित स्वरूपात इंधन आवक असलेली पाकणी साइडिंग २०२५ पासून मोठ्या प्रमाणावर मालवाहतुकीचे केंद्र म्हणून विकसित झाली आहे.

कोयाली (वडोदरा) ते पाकणी दरम्यानच्या ७५२ किलोमीटर लांबीच्या समर्पित पाइपलाइनद्वारे इंधन थेट पाकणी डेपोपर्यंत पोहोचवले जाते. या पाइपलाइनची वार्षिक क्षमता ५ दशलक्ष मेट्रिक टन असून, त्यानंतर रेल्वे रेकद्वारे विविध भागांत वितरण केले जाते. या व्यवस्थेमुळे इंधन वाहतुकीत सुरक्षितता, वेग आणि कार्यक्षमता लक्षणीयरीत्या वाढली आहे.

भारतीय रेल्वे व इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या प्रभावी समन्वयातून उभा राहिलेला हा उपक्रम सोलापूर विभागाच्या मालवाहतूक क्षमतेला नवी दिशा देणारा ठरत असून, प्रादेशिक तसेच राष्ट्रीय आर्थिक विकासात मोलाचे योगदान देत आहे.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) ख्रिश्चन लोकांचा धर्मग्रंथ २) घर (हिंदीत) ३) नदीचा काठ, बाण ४) बसपाच्या अध्यक्षा ५) एक कंदमूळ ६) बदक (इंग्रजीत), कड उलट लिहा ९) आर्थिक कुवत १०) हिंदी सिनेसृष्टीतील एक ज्येष्ठ अभिनेता १२) छ. शिवरायांच्या एक पत्नी १३) सल उलट लिहा १४) पम उलट लिहा १६) एक इंग्रजी मुळाक्षर १७) द्रोणाचार्यांना अंगठा कापून देणारा धनुर्धारी शिष्य १८) शिवकालीन लढाई पध्दत-गनिमा ** २०) लायब्ररी (मराठीत) २१) मादीच्या विरूध्दार्थी शब्द २३) स्वार्थ, हव्यास २६) दहशतयुक्त वजन, दरारा २७) निवृत्त भारतीय फलंदाज- राहुल *** २९) जादू, किमया ३१) खिडकीच्या वा दरवाजाच्या फटीतून आत येणारा किंचीतसा प्रकाश ३२) कुत्र्याचा जोडीदार ३४) वस्तूचे बाह्यस्वरूप, साईज (मराठीत) ३५) मांत्रिकाने दिलेला गळ्यात बांधतात तो ३८) कवितेतील जुळून येणारी रचना, शब्दालंकार ३९) आंबा (हिंदीत) ४०) वन, अरण्य (हिंदीत) ४१) युध्दापूर्वीची सामोपचाराची बोलणी

**आडवे शब्द :** १) सुप्रिया सुळे या लोकसभा मतदारसंघाच्या खासदार आहेत ४) धैर्यशील मोहिते-पाटील खासदार असलेला लोकसभा मतदारंघ, सोलापूर जिल्ह्यातील एक तालुका ५) धनंजय मुंडे या जिल्ह्यातील आहेत ७) तूप (हिंदीत) ८) छोटे चारचाकी प्रवासी वाहन ९) लगेच, त्वरेने ११) शरीर (हिंदीत) १२) सूट, मोकळीक १४) विषमच्या विरूध्दार्थी शब्द १६) तीस आणि एक मिळून होणारी संख्या १७) समरस, मग्न, दोन भिन्न वस्तूंचे पूर्णपणे एक होणे १८) गोंधळ, धरणाच्या पाण्याचा मोठा कॅनॉल १९) एक म्हण-** नको पण कुत्रं आवर २०) उणीव, टंचाई २२) विहिरीतून पाणी खेचण्याचे चक्रयंत्र २४) एक म्हण-*** तोंडी मोठा घास २५) पाणी निघून जाण्यासाठी खोदलेला छोटा पाट २६) मनावरील दडपण २७) धन, पैसाआडका २८) संशय (हिंदीत) ३०) महाराष्ट्राची राजधानी ३१) कविता रचणारा ३२) आधार (हिंदीत) ३३) लहान बाळाला टोचतात ती ३४) एखाद्या गोष्टीचा छंद, ही असेल तर सवड मिळते ३५) कब्जा, ** घेणे ३६) कडधान्याचे वाळलेले काटक्या ३७) शालेय मुलांचा घेतला जाणारा व्यायाम प्रकार ३९) माता, जननी ४०) पाऊस (हिंदीत) ४२) एक विदेशी मद्य ४३) निवडणुकीत उमेदवाराला मत देण्याची क्रिया ४४) गजराज, सोंड असलेला मोठा प्राणी ४५) बशीचा साथीदार

## सुडोकु - 169

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 6 | | 3 | | | 4 | 1 | |
| 1 | 8 | 5 | | 2 | | 7 | | 3 |
| | | | 5 | | | 9 | 2 | 8 |
| | 9 | 6 | 8 | | 2 | | 5 | 7 |
| 2 | 1 | | | 4 | | 3 | | |
| | 5 | | | | 6 | | 8 | 4 |
| 5 | | | | | 4 | 6 | | |
| | | | 6 | 1 | 3 | 5 | 4 | |
| | | 9 | | | 7 | | | |

# पंतप्रधान मोदी यांचे स्वच्छतादूतांवर उपासमारीची वेळ

## राज्यभर धरणे आंदोलनामुळे पाणी व स्वच्छतेची कामे ठप्प



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील पाणी व स्वच्छता विभागातील काम करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वच्छतादूतांवर उपासमारीची वेळ आली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काय निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेचे आज जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षात शुकसुकाट होता. कर्मचारी संपावर असलेले जिल्हा परिषदेचे अधिक्षक उपस्थित होते.

राज्यात या विभागात कार्यरत स्वच्छ भारत मिशन ग्रामीण व जलजीवन मिशन मधील कर्मचारी यांनी प्रलंबित वेतन व विविध न्याय मागण्या साठी आज पासून धरणे आंदोलन सुरू केले असल्याचे राज्य कृती समितीचे अध्यक्ष रमांकात गायकवाड यांनी सांगितले.

राज्यात विविध जिल्ह्यात धरणे आंदोलन करून शासनाचे धोरणाचा निषेध व्यक्त करणेत आला. राज्यातील पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील कर्मचारी यांचे विविध प्रश्न शासनाकडे प्रलंबित आहेत.

स्वच्छ भारत मिशन व जल जीवन मिशन अंतर्गत जिल्हा व तालुका स्तरीय कर्मचारी यांचे वेतन चार महिने पासून रखडले आहे. शासनाकडे निधीची उपलब्धता असून देखील तांत्रिक कारणे पुढे करून वेतन दिले जात नाही. या विभागात मुख्य सचिव यांनी शंभर दिवस अभियानांतर्गत न्यायालयीन प्रक्रियेत असलेले व न्यायालयाचे निर्णयास अधिन राहून कर्मचारी यांचे आकृतीबंध करणेत अशा सुचना दिले होते त्याची अंमलबजावणी नाही. स्वच्छ भारत मिशन ग्रामीण मध्ये २० वर्षा पासून कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत. मा. मुख्यमंत्री यांनी सामान्य प्रशासन विभागातून काढलेल्या शासन निर्णयास पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने केराची टोपली दाखविली आहे. मॅट न्यायालय व मुंबईतील उच्च न्यायालयाने आऊटसोर्सिंग चा निर्णय रद्द केला आहे. तरी ही पाणी पुरवठा व स्वच्छता विभागात कपातीचे नावाखाली आऊटसोर्सिंग चा घाट घातला जात आहे. तो रद्द करणेत करणेत यावा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा महत्त्वाकांक्षी असलेल्या स्वच्छ भारत मिशन ग्रामीण च्या कार्यातील स्वच्छतादूत कर्मचारी यांची अन्याय, पिळवणूक व उपासमार जाणून बुजून केली जात आहे.

गेल्या २० वर्षा पासून स्वच्छतेत व पाण्याच्या क्षेत्रात काम करणारे कर्मचारी यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस न्याय देणार का? याकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे. प्रकल्पातील नावे बदलून २० वर्षा पासून काम करणारे स्वच्छ भारत मिशन ग्रामीण व जलजीवन मिशन अंतर्गत काम कर्मचारी यांचेवर अन्याय केला जात आहे.

# श्री विठ्ठल कारखान्यावर ऊस तोडणी मजूरांचे मोफत सर्वरोग तपासणी शिबीर संपन्न



**वेणुनगर, (कटूसत्य वृत्त):-** वेणुनगर - गुरसाळे येथील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर ऊस तोडणी मजूरांची वैद्यकीय तपासणी करणेबाबत साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे निदेर्शानुसार श्री विठ्ठल कारखाना, श्री विठ्ठल सर्व सेवा संघ यांचे वतीने व प्राथमिक आरोग्य केंद्र रोपळे व प्राथमिक आरोग्य उपकेंद्र गुरसाळे यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक ३१.०१.२०२६ रोजी दुपारी ३ ते ५ या वेळेमध्ये आपले कारखान्यामध्ये सन २०२५-२६ हंगामात ऊस तोडणी मजूराकरिता सर्व रोग निदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीरादरम्यान क्षयरोग, कुष्ठरोग, रक्तदाब, रक्तातील साखर तपासणी, ई.सी. जी. अस्थीरोग व स्त्रीरोग तपासणी अशा विविध तपासणी करुन त्यावरील उपचार मोफत करणेत आले. सदर शिबीराचे उद्घाटन श्री विठ्ठलाचे प्रतिमेचे पुजन करून डॉ. ऋतुजा तरळगट्टी, वैद्यकिय अधिकारी, आरोग्य केंद्र, रोपळे यांचे शुभहस्ते करण्यात आले.

सदर प्रसंगी कार्यकारी संचालक डी.आर.गायकवाड म्हणाले की, कारखान्याचे चेअरमन, आमदार अभिजीत पाटील यांचे मार्गदर्शनाखाली सामाजिक बांधीलकी जपत ऊस तोडणी मजूरासाठी मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन केलेले आहे. चालु सिझनमध्ये कारखाना कार्यक्षेत्रातील गटामध्ये व गांवामध्ये फिरते पथकामार्फतही ऊस तोडणी मजूरांची तपासणी करुन औषधोपचार करणार आहोत. तरी सर्वांनी तपासणी करुन घ्याव्यात असे आवाहन त्यांनी केले.

स्वागत व प्रास्ताविक कारखान्याचे मुख्यशेती अधिकारी ए.व्ही. गुळमकर यांनी केले.

हे शिबीर यशस्वी होणेसाठी प्राथमिक आरोग्य केंद्र रोपळेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. ऋतुजा तरळगट्टी, गुरसाळे उपकेद्राचे समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. सचिन गुटाळ मेंढापूर समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. सचिन देवकते, जनरल फिजीशन डॉ. सौरुप साळुंखे, आरोग्य सेवक अरुण महाजन, अनिल माने, गंगाधर बगले, गणेश दराडे, श्रीमती सोमवंशी सिस्टर, श्रीमती वाडकर सिस्टर व प्राथमिक आरोग्य केंद्र रोपळे, उपकेंद्र गुरसाळे यांचा सर्व स्टाफ व आशा वर्कर तसेच कारखान्याचे फिल्ड स्टाफ यांनी शिबीर यशस्वीपणे पार पाडणेसाठी परिश्रम घेतले. या शिबीरामध्ये एकुण १२८ मजूर व स्त्री मजूर यांची तपासणी करणेत आली.

सदर कार्यक्रमास कारखान्याचे संचालक व कारखान्याचे सर्व अधिकारी, कर्मचारी वर्ग, ऊस तोडणी मजूर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कामती गटातील महिलांच्या सबलीकरणासाठी विशेष प्रयत्न करणार - विमलताई खताळ



**कुरुल (कटूसत्य वृत्त):-** घरातील महिला ही कुटुंबाचा प्रमुख आधार व कणा असते. घराचा डोलारा तिच्या नियोजनाखालीच सुरू असतो. प्रपंचातून काटकसर करत ती शेती, मुलांची शिक्षण आणि इतर सर्व खात्याचा कारभार सांभाळत असते. त्यामुळे तिला प्रमुख आधार मिळाला पाहिजे. ती सक्षम झाली पाहिजे यासाठी कामती गटातील महिलांना विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून सबलीकरणासाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन अगदी जिल्हा परिषद गटाच्या उमेदवार विमलताई खताळ यांनी केले.

कामती जिल्हा परिषद गटात नागरिकांना भेटत असताना या गटाचे नेतृत्व केलेले स्व.तानाजीराजे खताळ यांनी केलेल्या विकासकामांची पोहोच म्हणजे नागरिकांमधून मिळणारा मोठा प्रतिसाद आहे. कोरोना काळात त्यांचे झालेले अकाली निधन आणि त्यांनी कामती गटातील गावांसाठी स्व.तानाजीराजे खताळ यांनी विकासकामांचे केलेले शिस्तबद्ध नियोजन याबाबत प्रत्येक गावात स्व.तानाजीराजेंच्या कामांचे कौतुकच ऐकावयास मिळते आहे.

तर देशाचे पंतप्रधान ना .नरेंद्र मोदी व राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी व ग्रामीण भागातील नागरिकांसाठी सुरू केलेल्या शासकीय योजना,त्या योजनाचा मिळणारा लाभ थेट लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा होत असल्याने ग्रामीण भागातील प्रत्येक घटक शासनाच्या योजनांवर व कामांवर प्रचंड खुश आहे.त्यामुळे ज्या प्रमाणे महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायती च्या निवडणुकीत भाजपा ला जनतेने भरघोस असे यश दिले.त्याच प्रकारे येणाऱ्या जिल्हा परिषदेच्या व पंचायत समितीच्या निवडणुकीत ही भाजपा ला यश मिळेल अशी आशा मला वाटते असे भाजपा उमेदवार विमलताई खताळ यांनी यावेळी बोलताना सांगितले.

# तर सहजपणे पराभव पचविण्याची क्षमता रामभाऊ यांच्याकडे आहे

## 'तर याही वेळी त्यांचा सुपडासाफ होईल'



**अकलूज (विलास गायकवाड):-** माजी आमदार राम सातपुते हे कोणत्या कोणत्या निवडणुकीमध्ये, अभूतपूर्व पराभवाचे मानकरी ठरले आहेत. माळशिरस विधानसभा राखीव मतदारसंघातून, त्यांचा अभ्यास झालेला दारुण पराभव, त्यांनी सहजपणे पचविला असे कित्येक पराभव पचवण्याची क्षमता त्यांच्यामध्ये आहे.असे राजकीय जाणकार बोलून दाखवत आहेत.

मोहिते पाटील यांच्यापासून, दूर झाल्यानंतर,राम सातपुते हे माळशिरस तालुका राखीव मतदार संघातून, पुन्हा एकदा आमदार होण्यासाठी अत्यंत व्याकुळतेने प्रचार दौरे करत होते.मी आरोग्य दुत असून, रुग्णांना कशा प्रकारे मदत केली हा प्रचाराचा मुद्दा त्यांनी बनवला होता.निवडणूक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या असो अथवा विधानसभा, लोकसभेच्या असो, विकास कामांच्या मुद्द्यावर, प्रकर्षाने लढवल्या जातात.जनतेच्या समस्यांवर लढवल्या जातात. परंतु माजी आमदार राम सातपुते यांच्या प्रचाराचे मुद्दे, रुग्ण आणि त्यांना केलेली मदत!

रुग्णांना मदत केलीच पाहिजे, परंतु केलेल्या मदतीचे राजकारण अथवा निवडणुकीच्या रणांगणात भांडवल होऊ नये असे सर्वसामान्य जनतेला वाटते.कदाचित यामुळेही ते पराभवाचे मानकरी ठरले असतील.

पुढे सोलापूर लोकसभा मतदार संघात, काहीशी अशीच त्यांची गत झाली.मी ऊसतोड मजुराचा मुलगा आहे असे म्हणून त्यांनी भावनिक प्रचार आणि प्रसार केला.परंतु तिथल्या मतदारांनी सरळ सरळ त्यांचा पराभव करून,त्यांना बीडचा रस्ता दाखवला. परंतु तोही पराभव पत्करत त्यांनी नव्या जोमाने अकलूज नगरपरिषदेवर भाजपचा झेंडा फडकणार असल्याचा विडाच उचलला होता.परंतु अकलूजची जनता स्वाभिमानी आहे. त्यांच्या आमिषाला बळी पडले नाहीत.त्यांना त्यांची जागा दाखवून दिली.

सोलापूर जिल्ह्याचे भाग्यविधाते सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या जयंती निमित्त, विजय प्रताप युवा मंच व इतर संस्थांच्या वतीने खासदार धैर्यशील मोहिते पाटील हे गेल्या पंचवीस ते तीस वर्षापासून, नागरिकांसाठी आरोग्य शिबिरे राबवत आहेत. त्यांनी लाखो दिव्यांग बांधव यांच्या हता पायात, पुन्हा बळ देत, त्यांना स्वताःच्या पायावर उभे करण्याचे महान कार्य केले आहे व करत आहेत. कित्येक रुग्णांच्या डोळ्यांच्या सर्जरी झाल्या, त्यांना नव्याने दुनिया दाखवली.

कित्येक गंभीर आजार असलेल्या रुग्णांना मोफत वैद्यकीय सेवा दिली व ते अखंडपणे सुरू आहे. परंतु त्यांनी कधीच याचा निवडणुकीत उल्लेख केला नाही. त्याचे भांडवल केले नाही.खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांचे उत्तुंग कार्य आणि कर्तुत्व कामी आले म्हणूनच ते आज खासदार आहेत. सध्या माळशिरस तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचाराने वेग घेतला असून, माळशिरस तालुक्याची जनता स्वाभिमानी आहे.ते रामभाऊ सातपुतेच्या कसल्याही आमिषाला बळी पडणार नाहीत. ही जनता त्यांचा याही निवडणुकीत सूपडासाफ करतील. तरीही रामभाऊ हा पराभव जिव्हारी लावून घेणार नाहीत.कारण असे कित्येक पराभव त्यांनी सहजपणे पचविले आहेत असे राजकीय जाणकार बोलत आहेत.

# अक्कलकोट येथे सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** दिवंगत मुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल अक्कलकोट येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अजित पवार यांचा विकासात्मक दृष्टिकोन, दूरदृष्टी, रोखठोक स्वभाव, कामाशी असलेली निष्ठा, कार्यकर्ते जपणारा नेता, पुरोगामी विचाराशी बांधिलकी अशा विविध विषयांना स्पर्श करणाऱ्या भावना व्यक्त केल्या. राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष दिलीप सिद्धे आणि जिल्हा सरचिटणीस. प्रा. प्रकाश सुरवसे यांनी या शोकसभेचे आयोजन केले होते. यावेळी वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले उपस्थीत होते. यावेळी बाबासाहेब निंबाळकर, दिलीप सिधे, प्रा. प्रकाश सुरवसे, महेश हिंडोळे, शिवराज स्वामी, शिवशरण जोजन, अतुल जाधव, विजयकुमार कडगंची, शंकर व्हनमाने, शिवशंकर स्वामी, माणिक बिराजदार, आदींनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रशांत भगरे, अमर शिंदे, महेश भरडे जयकुमार राठोड, कुपेंद्र ढाले, शशिकांत पाटील, संजय जमादार, सुभाष गडसिंग राचप्पा वाघदरे, विजयकुमार कडगंची, सुधाकर गुंडाळ रुद्रया स्वामी, अविनाश शिंदे, मल्लिनाथ करपे, स्वप्निल शहा, निखिल पाटील, अरुण भुजंगे, संगम बडवे सुधाकर गुंडाळ, बसवराज बाणेगाव महादेव वाले, अरुण खोडवे, सचिन स्वामी, उपस्थीत होते.

# एमआयडीसी टेंभुर्णीत बेकायदेशीर वाळू वाहतूक; १० लाखांचा टिपर जप्त



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** टेंभुर्णी कुडूर्वाडीरस्त्यावर असणारी एम आय डी सी टेंभुर्णी परिसरात बेकायदेशीररित्या नदीपात्रातून वाळू उपसा करून वाहतूक केली जात असल्याच्या प्रकारावर महसूल व पोलिस विभागाच्या संयुक्त पथकाने कारवाई करत सहा चाकी टिपर जप्त केला आहे. या प्रकरणी वाहनमालक व चालक अशा दोघांविरुद्ध टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पर्यावरणाचे नुकसान करणाऱ्या या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

फियार्दीत नमूद केल्यानुसार, दिनांक ३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी सुमारे ६.४५ वाजण्याच्या सुमारास उपविभागीय अधिकारी कुडूवाडी विभाग व तहसीलदार माढा यांच्या आदेशानुसार महसूल विभागाचे पथक एमआयडीसी टेंभुर्णी परिसरात पेट्रोलिंग करत असताना पांढऱ्या रंगाचा, बिगर नंबरचा टाटा कंपनीचा सहा चाकी टिपर संशयास्पद अवस्थेत आढळून आला.

सदर वाहन ताब्यात घेऊन चौकशी केली असता चालकाने मौजे भिमानगर येथील भीमा नदीपात्रातून चार ब्रास वाळू भरून ती केम (ता. करमाळा) येथे खाली करून परत येत असल्याची माहिती दिली. पुढील कारवाईसाठी सदर वाहन व चालकास टेंभुर्णी पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले.

ग्राममहसूल अधिकारी शिवाजी सुभाष घाडगे यांनी पंचनामा करून चालक यशोदिप शिवाजी शितोळे (वय २१, रा. बेंबळे, ता. माढा) याचा जबाब नोंदविला असता सदर टिपर हा समाधान नारायण कोल्हे, रा. एमआयडीसी शेजारी, टेंभुर्णी, ता. माढा यांच्या मालकीचा असल्याचे निष्पन्न झाले. कोणतीही शासकीय परवानगी नसताना नदीपात्रातून वाळू उपसा व वाहतूक केल्याचे स्पष्ट झाल्याने सरकारतर्फे फिर्याद दाखल करण्यात आली.

या कारवाईत सुमारे १० लाख रुपये किंमतीचा टाटा कंपनीचा सहा चाकी टिपर जप्त करण्यात आला आहे. बेकायदेशीर वाळू वाहतुकीमुळे पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असून अशा प्रकारांवर कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

या प्रकरणी टेंभुर्णी पोलीस ठाणे भाग ५ येथे गुन्हा रजिस्टर नंबर ६७/२०२६ अन्वये भा.न्या. सं. २०२३ चे कलम ३०३(२) सह पर्यावरण संरक्षण कायदा कलम ९ व १५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणाचा तपास टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नारायण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकॉन्स्टेबल शिवाजी जाधव व पोलीस हेडकॉन्स्टेबल काशिद हे करीत आहेत.

# सोलापूरला जाज्वल्य पत्रकारितेचा इतिहास- डॉ. सचिन ओम्बासे



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. सोलापूरला जाज्वल्य पत्रकारितेचा इतिहास असून ही परंपरा जोपासण्याचे काम पत्रकारितेमधील विद्यमान पिढीकडून होत आहेत, असे गौरवोद्गार महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी काढले.

पत्रकार दिनानिमित्त सोलापूर महापालिकेच्यावतीने आयोजित पत्रकारांच्या सन्मान सोहळ्यात ते बोलत होते. या कार्यक्रमात आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. यावेळी महापालिका अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, उपायुक्त आशिष लोकरे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी महापालिका पत्रकार संघाच्या वतीने अध्यक्ष किरण बनसोडे यांच्या हस्ते आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांचा सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविक भाषणात अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी पत्रकारितेचे महत्त्व विशद केले. सोलापूरचे नागरी व इतर प्रश्न सोडवण्यात तसेच सोलापूरच्या विकासात पत्रकारांचे मोठे योगदान आहे. महापालिका प्रशासनाला पत्रकारांकडून नेहमीच चांगली साथ लाभत आली आहे, असे त्या म्हणाल्या.

यावेळी संचालक... याप्रसंगी विविध वृत्तपत्र व वाहिन्यांच्या पत्रकारांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी अध्यक्ष किरण बनसोडे यांनी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी गेल्या 349 दिवसांमध्ये केलेल्या वैशिष्ट्यपूर्ण कायार्चा गौरवपूर्ण उल्लेख केला. यावेळी महापालिकेचे जनसंपर्क अधिकारी गणेश बिराजदार, राजपाल जेटीथोर यांच्यासह पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

# श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात गुरुप्रतिपदा उत्सव भक्तीभावात संपन्न



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात आज गुरुप्रतिपदा उत्सव मोठ्या भक्तीभावात साजरा करण्यात आला. पहाटे ५ वाजता मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे व प्रथमेश इंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पुरोहित मोहनराव पुजारी व मंदार महाराज पुजारी यांच्या हस्ते श्रींची काकड आरती संपन्न झाली.

सकाळी ८:३० वाजता प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते देवस्थानचे लघुरुद्र करण्यात आले. दुपारी ११:३० वाजता श्रींना महानैवेद्य अर्पण करून भक्त निवास येथे स्वामी भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. याचा लाभ हजारो भाविकांनी घेतला. दिवसभर दुपारी १ ते ३ या वेळेतही मोठ्या संख्येने भाविकांनी श्रींचे दर्शन घेतले. भाविकांचे दर्शन सुरळीत व्हावे यासाठी मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचारी व सेवेकरी विशेष प्रयत्नशील होते.

सायंकाळी ५ वाजता सजविलेल्या पालखी सोहळ्याची सुरुवात पुरोहित मंदार महाराज, व्यंकटेश पुजारी व मोहित महाराज यांच्या हस्ते आरती करून करण्यात आली. देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे व श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते पालखी पूजन करून भव्य मिरवणुकीस प्रारंभ झाला.

ही पालखी मिरवणूक फत्तेसिंह चौक, मेन रोड, कारंजा चौक, समाधी मठ मार्गे विविध गल्लींतून फिरत रात्री साडे नऊ वाजता वटवृक्ष मंदिरात पोहोचली. त्यानंतर गुरु भजन झाले व सर्व भाविकांना शिरा प्रसादाचे वाटप करून उत्सवाची सांगता करण्यात आली. यावेळी मंदिर समितीचे पदाधिकारी, विश्वस्त, सेवेकरी व असंख्य स्वामीभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मतदारांना मतदान करण्यासाठी भरपगारी सुट्टी अथवा दोन तासांची सवलत द्यावी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक -2026 होणाऱ्या क्षेत्रात मतदानाच्या दिवशी दिनांक 7 फेब्रुवारी 2026 रोजी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी या क्षेत्रात असलेल्या मतदारांना मतदान करण्यासाठी सुट्टी अथवा दोन तासांची सवलत देण्याबाबत मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे दि 30 जानेवारी 2026 रोजी च्या परीपत्रकान्वये कळविले आहे. मतदानाच्या दिवशी सुट्टी दोन तासाची सवलत हि उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने दुकाने इत्यादीना लागू राहील.

सोलापूर जिल्हा परिषद पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर सोलापूर जिल्हयातील खाजगी कंपन्या मधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे नाटय गृहे व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, मॉल्स, रिटेलर्स इत्यादीना सुचना देण्यात येत आहे कि, दि. 7 फेब्रुवारी 2026 रोजी मतदानाच्या दिवशी कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सार्वजनिक सुट्टी देण्यात यावी.

जर अपवादात्मक परिस्थितीत अनुपस्थितीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होईल अशा धोकादायक अथवा लोकोपयोगी सेवेत अथवा आस्थापनांच्या संदर्भात संबंधित अधिकारी, कर्मचारी व कामगार इत्यादींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी दोन ते तीन तासांची विशेष सवलत मिळेल याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक आहे.

तरी सोलापूर जिल्ह्यातील कामगारांकरीता सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय सोलापूर यांच्या स्तरावर दक्षता कक्ष स्थापन करण्यात आले असून कामगारांना मतदानाकरीता सुट्टी अथवा दोन तासांची सवलत आस्थापना मालक देत नसल्यास कार्यालयाचे दुरध्वनी क्रमांक 0217-2728401 वर संपर्क साधून तक्रार करावी असे अतिरिक्त सहाय्यक कामगार आयुक्त मंगेश झोले यांनी आवाहन केले आहे.

# ग्राहकांची गुंतवणूक अधिक सुरक्षित ठेवण्यासाठी मनोरमा परिवार सतर्क- श्रीकांत मोरे



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मनोरमा को-ऑप बँक लिमिटेड व मनोरमा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने बँकिंग सायबर सेक्युरिटी जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन सोलापुरातील लोकमान्य टिळक सभागृहात करण्यात आले होते. वाढत्या सायबर फसवणुकीच्या पार्श्वभूमीवर ग्राहक व नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात आली.

यावेळी मनोरमा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या चेअरमन शोभा श्रीकांत मोरे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, ग्राहकांची गुंतवणूक अधिक सुरक्षित व सायबरमुक्त ठेवण्यासाठी मनोरमा परिवार कायम सतर्क असून ठेवीदारांच्या पैशांची सुरक्षा हीच बँकेची सर्वोच्च प्राथमिकता आहे. मनोरमा को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन श्रीकांत मोरे यांनी अध्यक्षीय भाषणात सायबर फ्रॉडचे प्रत्यक्ष किस्से सांगत जनजागृतीचे महत्त्व सांगतानाच ऑनलाइन व्यवहारांचे प्रमाण झपाट्याने वाढत असताना प्रत्येक नागरिकाने स्वतःच्या पैशांबाबत सजग राहणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी सोलापूर शहर सायबर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीशैल गजा यांनी सायबर सुरक्षेचे महत्त्व स्पष्ट करताना ग्राहकांनी जागरूक राहणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. मोबाईलमुळे जग जवळ आले असले तरी त्याचे फायदेझ्रतोटे समजून घेऊन स्क्रीन टाइम मर्यादित ठेवणे, डिजिटल अरेस्ट, सायबर फ्रॉड यांसारख्या प्रकारांपासून सावध राहणे आवश्यक आहे असे आवाहन केले.

सायबर तज्ज्ञ अविनाश पाटील यांनी व्हिडिओ व ऑडिओ क्लिप्सद्वारे सायबर फसवणुकीचे गांभीर्य उपस्थितांच्या लक्षात आणून दिले. भीती, लालच व वासना हे सायबर गुन्ह्यांचे प्रमुख हत्यार असल्याचे सांगत अनोळखी कॉल व व्हिडिओ कॉल टाळण्याचा सल्ला त्यांनी दिला. पोलीस किंवा बँक कधीही फोनवरून वैयक्तिक माहिती मागत नाही, हेही त्यांनी सांगितले.यावेळी सायबर जनजागृती पथकातील प्रांजली काळे व सचिन अंबलगी यांनीही उपयुक्त मार्गदर्शन केले.

मनोरमा बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी शिल्पा कुलकर्णी - मोहिते यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सूत्रसंचालन विद्या भोसले यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. सुमित मोरे यांनी केले. या कार्यक्रमास मनोरमा बँकेचे संचालक दत्ता मुळे, शशिबाला चंडक, सिद्राम पाटील यांच्यासह ग्राहक, सभासद व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**सायबर सुरक्षिततेसाठी महत्त्वाच्या सूचना**

- अनोळखी मोबाईल/व्हिडिओ कॉल उचलू नयेत
- बँक किंवा पोलीस कधीही फोनवर वैयक्तिक माहिती मागत नाहीत
- डिजिटल अरेस्ट नावाची कोणतीही अधिकृत प्रक्रिया नाही
- संशयास्पद लिंक, ॲप्स व मेसेजपासून दूर राहा
- आर्थिक फसवणूक झाल्यास त्वरित सायबर पोलीस व बँकेशी संपर्क साधा